आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
शनिवार, दिनांक ३० मार्च २०२४

ठळक बातम्या

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न प्रदान.
- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातला उमेदवारी अर्ज मागं घेण्याचा आज शेवटचा दिवस.
- यंदाच्या लोकसभा निवडणुकीत मतदानाचं प्रमाण ७५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचं निवडणूक आयोगाचं उद्दिष्ट.
- सरकारी ई-मार्केट 'जेम'मध्ये चालू आर्थिक वर्षात ४ लाख कोटी रुपयांची विक्रमी खरेदी.

*****

भारतरत्न

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न प्रदान केले. माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्या वतीनं त्यांचे चिरंजीव पी. व्ही. प्रभाकर राव, चौधरी चरणसिंह यांच्या वतीनं त्यांचे नातू जयंतसिंग, बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांच्या वतीनं त्यांचे चिरंजीव रामनाथ ठाकूर यांनी पुरस्कार स्वीकारला. कृषी शास्त्रज्ञ एम. एस. स्वामिनाथन यांच्या वतीनं त्यांच्या कन्या नित्या राव यांनी भारतरत्न सन्मान स्वीकारला. माजी उपपंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांना राष्ट्रपती उद्या पुरस्कार प्रदान करतील. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि इतर मान्यवर या समारंभाला उपस्थित होते.

गडकरी रोड शो

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातला उमेदवारी अर्ज मागं घेण्याचा आज शेवटचा दिवस आहे. १७ राज्यं आणि ४ केंद्रशासित प्रदेशांमधे मिळून लोकसभेच्या १०२ जागांसाठी १९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.महाराष्ट्रातल्या नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली - चिमूर, चंद्रपूर आणि रामटेक या मतदारसंघांचा यात समावेश आहे. उमेदवारी अर्ज मागं घेण्याची मुदत आज संपल्यावर सर्व ठिकाणच्या लढतींचं चित्र स्पष्ट होईल. महाराष्ट्रात प्रामुख्यानं भाजपा विरुद्ध काँग्रेस अशीच लढत या टप्प्यात होणार आहे. केंद्रीय मंत्री आणि भाजपचे नागपूर मतदारसंघातले उमेदवार नितीन

गडकरी यांनी आज मध्य नागपुरात रोड शो केला. राजवाडा पॅलेस जवळील भारत माता चौकातून लोकसंवाद यात्रेला प्रारंभ झाला. मोठ्या संख्येनं भाजप कार्यकर्ते त्यात सहभागी झाले होते. गडकरी नागपूर मतदारसंघातून तिसऱ्यांदा लोकसभा निवडणूक लढवत आहेत. सार्वत्रिक लोकसभा निवडणूक-२०२४ अंतर्गत अमरावती लोकसभा मतदारसंघात आज राष्ट्रीय काँग्रेसचे उमेदवार बळवंत वानखडे या उमेदवाराकडून चार नामनिर्देशन पत्रं दाखल करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं लोकसभा निवडणुकांसाठी पाच उमेदवारांची पहिली यादी आज जाहीर केली. वर्धा इथून अमर काळे यांना उमेदवारी देण्यात आल्याची घोषणा प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आज माध्यमांसमोर केली.

एक्झिट पोल

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय निवडणूक आयोगानं एक्झिट पोल अर्थात मतदानोत्तर कल जाहीर करण्याबाबत मर्यादा घालून दिल्या आहेत. या निवडणुकांसाठी मतदान पूर्ण झालं तरी, मतदानोत्तर कल घोषित करण्यावर आयोगानं एक जूनपर्यंत बंदी घातली आहे. अर्थात, लोकसभा निवडणुकांची मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कुठल्याही ठिकाणचे एक्झिट पोल जाहीर करता येणार नाहीत.

छगन भुजबळ

लोकसभेच्या नाशिकच्या जागेसाठी आपल्या उमेदवारीचा प्रस्ताव दिल्लीत झालेल्या महायुतीच्या बैठकीत मांडण्यात आला आणि चार ते पाच महिन्यापूर्वी आपल्याला कळविण्यात आलं. त्यानुसार आपण चाचपणी केली आहे. मात्र, अद्याप जागावाटप झालेलं नाही, असं राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते आणि अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी आज नाशिक इथं माध्यमांशी बोलताना सांगितलं.

अंबादास दानवे

विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शिवसेना सोडणार नसल्याचं स्पष्ट केलं आहे. आज मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी भाजपमध्ये जाणार असल्याच्या वृत्ताचं खंडन केलं. दरम्यान, खोट्या बातम्या प्रसारित करणाऱ्या वृत्तवाहिन्यांवर मानहानीचा दावा करणार असल्याचंही दानवे यांनी म्हटलं आहे.

निवडणूक आयोग

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत मतदानाचं प्रमाण ७५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचं उद्दिष्ट निवडणूक आयोगानं ठेवलं आहे. त्यासाठी थेट मतदान केंद्रांच्या पातळीवर जाऊन

आढावा घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी आकाशवाणीला दिली आहे.

एस.चोक्कलिंगम

लोकसभा निवडणुकीच्या अनेक मुद्द्यांवर राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी आकाशवाणीला विशेष मुलाखत दिली आहे. आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर दोन भागात आज आणि उद्या संध्याकाळी सव्वा ७ वाजता 'वृत्तविशेष' या कार्यक्रमात ही मुलाखत ऐकता येईल. दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातल्या सर्व लोकसभा मतदार संघातली परिस्थिती आणि एकूण घडामोडींचा आढावा घेण्यासाठी, 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम देखील आकाशवाणी घेऊन येत आहे. येत्या सोमवारी एक एप्रिलपासून संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेदरम्यान हा कार्यक्रम आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवरून प्रसारित केला जाणार आहे.

जेम

जेम अर्थात सरकारी ई मार्केटमध्ये चालू आर्थिक वर्षात ४ लाख कोटी रुपयांची विक्रमी खरेदी झाली आहे. ही रक्कम मागील वित्त वर्षाच्या तुलनेमध्ये दुप्पट असल्याची माहिती काल नवी दिल्लीमध्ये जेमचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. के. सिंह यांनी पत्रकारांना दिली. यामुळं जेम पोर्टलची डिजिटल क्षमता आणि कार्यक्षमतेविषयी विश्वास व्यक्त होतो, असंही ते म्हणाले. सरकारी खरेदीमध्ये दक्षता, पारदर्शकता आणि कोणत्याही अडथळ्याशिवाय कारभार होत असल्याचं यावरून निदर्शनास येत आहे. स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहित करण्यासाठी, व्होकल फॉर लोकल, एक जिल्हा एक उत्पादन, स्टार्टअपचा वापर करणं यासारख्या प्रयत्नांमुळं घरगुती उद्योग करणाऱ्यांना समान संधी उपलब्ध करून देणं आणि त्यांचा व्यवसाय वाढवण्याच्या संधी उपलब्ध करून देणं, हा यामागचा उद्देश असल्याचं सिंह यांनी सांगितलं.

मतदार जनजागृती

लोकसभा निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी,तसंच नवमतदारांनी आणि महिलांनी मतदानासाठी जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा यासाठी वाशिम जिल्हा निवडणूक कार्यालय आणि तहसील कार्यालय कारंजा तसंच सामाजिक संस्था यांच्या वतीनं आज मतदार जनजागृती सायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस.,उपविभागीय अधिकारी कैलास देवरे, तहसीलदार कुणाल झाल्टे, तहसील कार्यालयाचे कर्मचारी, वन विभाग आणि शिक्षण विभागाचे कर्मचारी

तसेच शालेय विद्यार्थी आणि विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आणि सदस्य यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला.

बी.ज्योतिकिरण

अकोला लोकसभा सार्वत्रिक निवडणूक खर्च निरीक्षक बी.ज्योतिकिरण आज जिल्ह्यात दाखल झाल्या असून त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन इथं बैठक घेत खर्च निरीक्षकांकडून निवडणूक यंत्रणेचा आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी अजित कुंभार, स्वीप नोडल अधिकारी बी. वैष्णवी, यांच्यासह सर्व सहायक निवडणूक अधिकारी, तसंच नोडल अधिकारी प्रामुख्यानं उपस्थित होते.

निवडणुकीवर बहिष्कार

महाराष्ट्रात आणि केंद्रात काँग्रेसचं सरकार असताना २०१३ मध्ये भंडारा जिल्हयाच्या लाखनी तालुक्यात भारत हेवी लिमिटेड प्लांट ‘भेल’ करिता पायाभरणी करण्यात आली होती. शेतकऱ्यांकडून हस्तांतरित केलेल्या जमिनी फक्त वॉल कंपाऊंड करून ताब्यात घेण्यात आल्या. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी शासनानं खरेदी केल्या, ते आता भूमिहीन झाले आहेत. 'आमची शेती परत करा, नाही तर त्याच जमिनीवर आम्ही शेती करणार', असा इशारा आता शेतकऱ्यांनी सरकारला दिला आहे. या क्षेत्रातील तरुण बेरोजगार युवकांनी या निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

मानवी साखळी

मतदान जागृतीसाठी यवतमाळमध्ये नेहरू स्टेडियम इथं हजारो विद्यार्थ्यांनी मानवी साखळीतून भारताचा नकाशा साकारला. 'वोट' असा मजकूर आणि मतदान चिन्ह देखील यावेळी साकारण्यात आलं.

कचरा आणि बांधकाम

नागपूर शहराला स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी शहरात दररोज निर्माण होणारा कचरा आणि बांधकाम तोडीचा कचरा अर्थात मलबा गोळा करण्याचं काम नागपूर महानगरपालिकेतर्फे सुरू करण्यात आलं आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार मनपाच्या उपद्रव शोध पथकाद्वारे दहाही झोनमध्ये पडून असलेल्या बांधकाम मलब्याची माहिती संकलित करण्यात आली असून ते झोननिहाय पथकाद्वारे उचलण्यात येणार आहे. याशिवाय शहरात शासकीय संस्थांमार्फत सुरू असलेल्या विकास कामांच्या स्थळी निर्माण होणारा मलबा देखील पथकामार्फत उचलण्यात येणार आहे.

माद्रीद बॅडमिंटन

माद्रीद खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या एन सिक्की रेड्डी आणि बी सुमित रेड्डी या जोडीनं मिश्र दुहेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्यपूर्व फेरीत काल त्यांनी इंडोनेशियाच्या जोडीवर २१-१४, ११-२१, १७-२१ असा विजय मिळवला. महिला दुहेरीत भारताच्या तनिषा क्रॅस्टो आणि अश्विनी पोन्नप्पा या जोडीला उपांत्यपूर्व फेरीत पराभव पत्करावा लागला.

उन्हामुळं त्रास

अकोला इथं गडंकी प्रशिक्षण केंद्रात काल दुपारनंतर जवळपास १५ प्रशिक्षणार्थी महिला पोलिसांना दूषित पाणी आणि कडक उन्हामुळं त्रास झाला. त्यांना तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

हवामान

विदर्भातल्या काही जिल्ह्यांमध्ये आज तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ येण्याची आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह हलका पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. आगामी दोन तासात अकोला, अमरावती, वाशिम, यवतमाळ, वर्धा, नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. नागपूर आणि चंद्रपूर इथं काही ठिकाणी गारपीट देखील होण्याची शक्यता आहे. दरम्यान, आज अकोला इथं ४२ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली, तर नागपुरात आज ४१ अंश सेल्सियस इतकं कमाल तापमान नोंदविण्यात आलं.

*****